REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १६ ऑगस्ट, १९४४ अंक ३३



भजनावर
भक्तगण भाळले
व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति
डेक्कन —व— अपॉलो
ह्या दोन थिएटरांत
शुक्रवार ता. ११ ऑगस्टपासून सुरू झाला !

प्रोड्यूसरः—
व्ही. शांताराम,
दिग्दर्शकः—
केशवराव दाते,

भक्तीचा मळा (माली)

भूमिकाः— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अमीना ● सामंत ● राजा पंडित

अपोलो : दररोज दुपारीं ३॥, व सायं. ६॥ चे पहिले दोन खेळ हिंदी व रात्रौ १० चा तिसरा खेळ मराठी | डेक्कन : दररोज ४, ७ व १० वा. तिन्ही खेळ मराठी

सकाळीं १० ते १२ डेक्कन व अपॉलोमध्यें वरच्या वर्गांचीं तिकिटें अगाऊ रिझर्व्ह केलीं जातील.—कॉम्प्लिमेंटरी व फ्री पास अजिबात बंद.

गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### ग्रेट ब्रिटनमधील लोकांचा खर्च

ग्रेट ब्रिटनमधील मनुष्य त्यास मिळणाऱ्या प्रत्येक १०० रुपयांच्या उत्पन्नापैकीं २५ रुपये अन्नावर व २१ रुपये दारू व तंबाखू ह्यांवर खर्च करतो. १९३८ सालीं हेच आकडे अनुक्रमें ३० रुपये व ११ रुपये होते. अर्थात्, त्यावेळीं उत्पन्न आतांपेक्षा २०% कमी होतें. दारू व तंबाखू ह्यांवरील खर्च वाढला असला, तरी त्याचा बराच मोठा भाग सरकारास कराचे रूपानें मिळतो.

### विजेच्या रोषणाईवर निर्बंध

विजेच्या दिव्यांचा तुटवडा व आवश्यक कामास वीज पुरी पडावी ह्यासाठी विजेची बचत करण्याचें महत्त्व, हीं लक्षांत घेऊन ह्यापुढें तात्पुरत्या रोषणाईस विजेचा पुरवठा मंजूर करण्यांत येणार नाहीं, असें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. युद्धकार्यास अथवा तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या कार्यास रोषणाई आवश्यक असेल, तरच तिला मंजुरी देण्यांत येईल.

### ब्रिटिश भांडवल कोणत्या देशांस मिळेल ?

"युद्धानंतर आपलें भांडवल जगभर पेरणें आपणांस शक्य होणार नाहीं; १९ व्या शतकांत तें जमलें. सर्व दृष्टींनीं चोकशी करून व भांडवलावर नियंत्रण ठेवूनच आपणास तें पाठवितां येईल. आयात कोणत्या मालाची करावयाची, कोणत्या देशांस प्राधान्य द्यावयाचें, परदेशांतील आपल्या भांडवलाच्या गुंतवणुकीचें काम करावयाचें, हें सर्व ब्रिटिश पार्लमेंटालाच ठरवावें लागेल." —मि. एच. जे. वेडरबर्न ह्यांचे उद्गार.

### मुंबई प्रांतांत ६४ गावांमध्यें रेशनिंग

मुंबई प्रांतांत आतां ६४ गावांत रेशनिंग चालू आहे. १ ऑगस्ट रोजीं अहमदनगर, सातारा, महाबळेश्वर, पांचगणी, वाई, कराड व दोहद येथें रेशनिंगला प्रारंभ झाला. ह्या सात गावांचा समावेश वरील ६४ गावांत होतो.

### बडोदें संस्थानांतील गिरण्या

बडोदें संस्थानांत कापसाच्या सुताच्या व कापडाच्या गिरण्या ह्यांची प्रगति अति झपाट्यानें झाली आहे, हें खालील आकडे दर्शवितील:—

| | १९३२–३३ | १९४२–४३ |
|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | १४ | १८ |
| गुंतलेलें भांडवल ( रु. ) | १ कोटि, ९५ लक्ष | ४ कोटि, ६ लक्ष |
| भागांची संख्या | ४,२८३ | ६,९३२ |
| सुताचें उत्पादन ( पौंड ) | २३१ लक्ष | ४३१ लक्ष |

### लँकेशायर व यॉर्कशायर येथील गिरण्यांवर एक कोटि लोकांचा उदरनिर्वाह

ग्रेटब्रिटनमधील उद्योगधंद्यांत कापडाच्या गिरण्यांचें महत्त्व विशेष आहे. युद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमधून दरसाल १० कोटि रुपये किंमतीचे शर्ट व सूट निर्गत होत असत. १९३८ सालीं एकट्या सुताच्या निर्गतीची किंमत ५ कोटि पौंड भरली ! लँकेशायर व यॉर्कशायर येथील गिरण्यांवर १ कोटि स्त्रीपुरुषांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यांच्या उत्पादनाची किंमत ४४½ कोटि पौंड भरते व हें उत्पादन बहुतेक सर्व परदेशीं जातें. त्याच्या मोबदला खाद्यपदार्थ बाहेरून येतात.

### रिझर्व्ह बँकेचा नफा व त्याची वाटणी

हिंदी रिझर्व्ह बँकेस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १०,२६,५७,८१० रुपये निव्वळ नफा झाला. बँकेजवळील रोख्यांत बरीच मोठी भर पडल्याकारणानें त्यांच्या व्याजाच्या उत्पन्नामुळें बँकेच्या निव्वळ नफ्यांत २ कोटि, ५७ लक्ष रुपयांची भर पडलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ४७ व्या कलमास अनुसरून ३½% डिव्हिडंड देण्यासाठी १७½ लक्ष रुपये लागतात. १९४२ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ऑर्डिनन्सनें बँकेच्या नफा वाटणीचा कमाल दर ४% ठरवून टाकला आहे. त्यामुळें फक्त ½% च ज्यास्त डिव्हिडंड बँक देऊं शकते, त्यास २½ लक्ष रुपये लागतील. उरलेली १०,०६,५७,८१० रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारास मिळेल.

### मुंबई प्रांतांतील कारखान्यांत वाढ

मुंबई प्रांतांत १९४२ सालीं ३,७१९ कारखाने चालू होते. ही संख्या १९४१ मधील कारखान्यांच्या संख्येपेक्षा ९८ नें ज्यास्त आहे. कित्येक कारखान्यांनीं वाढ केली व त्यामुळें त्यांचें उत्पादन वाढलें. दोन व तीन पाळ्या चालू ठेवणारे कारखाने पुष्कळ होते. नवीन लिमिटेड कंपन्या काढण्यास आर्थिक व औद्योगिक परिस्थिति सोईची होती. १९३८-३९ ते १९४२-४३ ह्या पांच वर्षांत दरवर्षी नोंदण्यांत येणाऱ्या कंपन्यांची संख्या १३८ वरून ३४० वर गेली व अधिकृत भांडवलाचा आकडा १८ कोटि रुपयांवर गेला. ह्याच पांच वर्षांत कारखान्यांची संख्या १,२२४ नें वाढून ती ३७१९ झालेली आहे व त्यांतील कामगारांची सरासरी संख्या ४,७९,१०३ ची ६,५१,३२४ झाली आहे.

### ब्रह्मी आघाडीवरील हानी

ब्रह्मी आघाडीवर दोस्तांचे ५,९१८ सैनिक मरण पावले, १९,९१६ जखमी झाले व २,५९४ बेपत्ता आहेत. ब्रिटिश, हिंदी व पश्चिम आफ्रिकेंतील सैनिकांचा ह्यांत मुख्यतः भरणा आहे.

### हिंद–ब्रिटन देवघेवींचा हिशेब

" हिंदुस्थानास देणें लागत असलेली रक्कम वाढत जाऊं दिल्यानें निर्माण होणारा कर्जाचा बोजा आपल्या कित्येक पिढ्या उतरवूं शकणार नाहींत. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्याचा विचार केला पाहिजे. मालाचे स्वरूपांतच हिंदुस्थान कर्जाची वसुली करूं शकेल. शेंकडो कोटि पौंडांचा माल त्यासाठीं ग्रेट ब्रिटनला करावा लागेल व त्याकरितां कित्येक वर्षें सक्त मेहनत करावी लागेल. आज चालत आहेत तसेच हिशेब चालू ठेवले, तर हा व्यवहार हिंदुस्थानास पोषक परंतु ग्रेटब्रिटनला चांगलाच मारक होईल."— हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें फुगत चाललें आहे, त्यासंबंधीं चिंता व्यक्त करतांना सर आल्फ्रेड वॉटसन ह्यांनीं वरील प्रकारचे उद्गार काढले आहेत.

### नवे रेल्वे रस्ते

युद्धसमाप्तीनंतर ५ हजार मैल लांबीचे रेल्वेरस्ते तयार करण्यांत यावयाचे आहेत, त्यांपैकी २½ हजार मैलांचे रेल्वे रस्ते पहिल्या सात वर्षांत पुरे व्हावयाचे आहेत, अशी हिंदुस्थान सरकारची योजना आहे. कांहीं वर्षें तरी ह्या रेल्वे रस्त्यांपासून सरकारास दरसाल किमान १२ कोटि रुपये तूट येईल, अशी अपेक्षा आहे. पुढें फायदा दिसूं लागेल. प्रांतिक सरकारें, संस्थानें व रेल्वेज ह्यांच्या सल्ल्यानें कोणतीं कामें आधीं हातीं घ्यावयाचीं, हें ठरविण्यांत येईल.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २५८ |
| २ अण्णासाहेब चिरमुले: चरित्र व कार्य ... | २५९ |
| ३ नैट्रोजन रसायनांचें उत्पादन ... | २६० |
| ४ स्फुट विचार ... | २६१ |
| रॉकेलचें आर्थिक वैशिष्ट्य—तेलाच्या पुरवठ्याचें पुनर्घटनेंत स्थान—रिझर्व्ह बँकेचें डिव्हिडंड—हिंदी धंद्यांचें भवितव्य—युद्धोत्तर औद्योगिक योजना | |
| ५ प्रेसिडेन्सी इं. बँकेची प्रगति ... | २६३ |
| ६ टाटा केमिकल्स लि. | २६३ |

अर्थ

बुधवार, ता. १६ ऑगस्ट, १९४४

## विमामहर्षि अण्णासाहेब चिरमुले : चरित्र व कार्य*

श्री. वा. ग. उर्फ अण्णासाहेब चिरमुले ह्यांना ८१ वें वर्ष लागण्याच्या प्रसंगीं ( ४ जून, १९४४ ) त्यांच्या संबंधीं शुभेच्छापूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां म्हणून सातारा शहरामधील त्यांच्या चहात्या व ऋणानुबंधी गृहस्थांतर्फे एक सत्कार-समिति स्थापन करण्यांत आली. सत्काराच्या प्रासंगिक व शाश्वत अशा दोन भागांपैकीं शाश्वत सत्कारांत श्री. चिरमुले ह्यांच्या चरित्राचा समावेश होतो. हें चरित्र लिहिण्याचें काम श्री. वा. ह. खाडिलकर ह्यांजकडे सोपविण्यांत आलें. श्री. खाडिलकर हे " वेस्टर्न इंडिया " च्या वरिष्ठ नोकरवर्गांत काम करीत आलेले असल्याकारणानें त्यांना श्री. चिरमुले ह्यांच्या व्यक्तित्वाचा व कार्यपद्धतीचा चांगला परिचय आहे. चरित्रलेखनाचें काम त्यांनीं थोड्या अवधींत उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे.

परिस्थितीशीं झगडून बी. ए., एलएल. बी. झाल्यावर श्री. चिरमुले ह्यांनीं शिक्षकाची नोकरी सोडली व मुधोळ येथें न्यायाधीश म्हणून ते दाखल झाले. परंतु त्यांच्या निःस्पृही स्वभावामुळें त्यांनीं लवकरच राजीनामा दिला व १८९४ सालीं साताऱ्यास येऊन वकिलीस प्रारंभ केला. देशाभिमान, स्वदेशीबद्दल आस्था, लोकसेवेची मनापासून आवड, इत्यादि गुणांमुळें श्री. चिरमुले हे साताऱ्यांतील तद्विषयक उपक्रमांत पुढाकार घेऊं लागले. त्यांनीं प्रथम कापड दुकान काढलें. त्यांत पुढें साखर शिरली. ह्या दोन धंद्यांस लागणाऱ्या भांडवलासाठीं ठेवी घेण्यासहि प्रारंभ झाला. सालोसाल ठेवी वाढूं लागल्या. सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनीची स्थापना साताऱ्यांत होऊन तिच्या कार्याचा विस्तार साखर, कापड व नंतर बँकिंग ह्यांत झाला. सहकारी चळवळींतहि श्री. चिरमुले ह्यांनीं लक्ष घातलें. के. ल. कृ. उर्फ काकासाहेब जोशी ह्यांनीं साताऱ्यास वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचा कल्पवृक्ष लावण्यांत पुढाकार घेतला व ह्या कंपनीच्या संवर्धनाचें काम श्री. चिरमुले ह्यांनीं स्वीकारलें. कंपनी स्थापन करण्याचा उद्देश देशी विमा-कंपनी काढून विमा हप्त्यांच्या रूपानें परदेशांत जाणारा पैशाचा ओघ थांबविणें, हा होता; व्यक्तिगत स्वार्थाची त्यांत कल्पनाहि नव्हती. ह्याच उदात्त तत्त्वास अनुसरूनच वेस्टर्न इंडियाचा कारभार आजहि चालू आहे. वेस्टर्न इंडियाच्या स्थापनेचे अगोदर कांहीं कंपन्यांत मॅनेजिंग एजन्सीची पद्धति अमलांत होती, ती पुढें अनेक विमा संस्थांत अवलंबिण्यांत आली. त्याचे दुष्परिणाम इतके भडक झाले, कीं कायद्यानें ती बंद करणें अखेर भाग पडलें. विमा कंपनी ही वस्तुतः विमेदारांचीच आहे ही भावना "वेस्टर्न इंडिया"-च्या स्थापनेपासून तिचे चालकांची असल्याकारणानें तिच्या घटनेंत त्या भावनेस अनुसरूनच नियम करण्यांत आलेले आहेत. मूळ संस्थापकांनीं स्वार्थत्यागाचे पायावरच कंपनीची उभारणी करून तिची वाढ केली. काटकसर हें तर कंपनीचें आरंभापासूनचें वैशिष्ट्य आहे. कंपनी सुरू होते न होते तोंच बँका बुडण्याची साथ सुरू झाली व देशी कंपन्यांवरचा लोकांचा विश्वास नाहींसा होऊन एजंटांना काम मिळविणें कठीण जाऊं लागलें. अशा बिकट परिस्थितींतहि कंपनीचें पहिलें मूल्यमापन १९१७ अखेर झालें. त्यांत ११½ हजार रुपये वाढावा दिसून आला. १९२० च्या मूल्यमापनांत विमेदारांस बोनस व भागीदारांना नफा देतां येण्याजोगी परिस्थिति दृष्टोत्पत्तीस आली आणि "वेस्टर्न इंडिया"ची कीर्ति महाराष्ट्रभर पसरली. कोठल्याहि कंपनीची प्रगति अव्याहत होत नाहीं; तींत कित्येक नाजुक व पेचाचे प्रश्न उपस्थित होतात व ते सोडवितांना व्यक्तीपेक्षां संस्थेकडे लक्ष देणाऱ्या चालकांचे पदरीं वाईटपणा येण्याचा नेहमींच संभव असतो. कंपनी उभारण्यांत स्वार्थत्याग करणाऱ्यांच्याहि कांहीं अपेक्षा असतात, त्या पुऱ्या पडल्या नाहींत, म्हणजे साहजिकच कंपनीच्या प्रमुख लोकांत मतभेद निर्माण होऊन मनें कलुषित होतात. अशा प्रसंगीं जबाबदार व्यक्तींना अतिशय समयसूचकता आणि शांत वृत्ति धारण करावी लागते. "वेस्टर्न इंडिया"-वरहि इतर अनेक महाराष्ट्रीय कंपन्यांप्रमाणें, असे प्रसंग आले. तथापि, त्यांतून वेस्टर्न इंडिया कंपनी निभावून गेली. श्री चिरमुले ह्यांचें धोरण सावधगिरीचें व काटकसरीचें असलें आणि वेस्टर्न इंडिया कंपनी अत्यंत मजबूत झाली असली, तरी तिला मिळणारें काम मात्र इतर देशी कंपन्यांच्या मानानें फार कमी होतें. " वेस्टर्न इंडिया"चा व्यवहार पुष्कळ वाढून ती अग्रेसर हिंदी विमा कंपनी व्हावी, असें मत १९२८ च्या सुमारास उघड प्रतिपादलें जाऊं लागलें. तथापि, श्री. चिरमुले व " वेस्टर्न इंडिया " ह्यांचा एवढा एकजीव झालेला होता, कीं १९२८ च्या वार्षिक निवडणुकींत श्री. चिरमुले ह्यांच्या पाठीराख्यांस निर्विवाद बहुमत मिळालें. कंपनीची प्रगति जरा धडाडीनें झाली पाहिजे, ही सत्य गोष्ट होती व तिला अनुसरून तिचा विस्तारहि नंतर आखण्यांत आला. " वेस्टर्न इंडिया"नें आतां १ कोटि रुपयांची वार्षिक कामाची मर्यादा ओलांडली आहे, हें सुप्रसिद्धच आहे. १९३६ सालीं " वेस्टर्न इंडियानें " युनायटेड वेस्टर्न बँक लि. ही संस्था स्थापली, तिचीहि प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे.

श्री. चिरमुले ह्यांच्या कार्याचें महत्त्व " वेस्टर्न इंडिया " च्या यशापुरतेंच मर्यादित नाहीं. त्यांच्या स्वतःच्या व " वेस्टर्न इंडिया " च्या उदाहरणानें कित्येक व्यक्तींस स्फूर्ति मिळालेली आहे व कित्येक व्यापारी आणि औद्योगिक संस्थांस चालना मिळालेली आहे. श्री. चिरमुले ह्यांनीं आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी विमा कंपनी काढली; आज त्यांचें वय ८१ वर्षांचें आहे, ही गोष्टहि

* ले. वामन हरि खाडिलकर, बी. ए., बी कॉम., प्र. चिरमुले सत्कार समिति, सातारा. पृ. सं. २५९, किं. ५ रु.

लोकांना मार्गदर्शक होणारी आहे. चारित्र्य आणि कर्तृत्व ह्यांचेवर आधारलेले त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले व त्यांस जनतेचाहि सक्रिय पाठिंबा मिळाला, ह्यावरून चांगल्या पायावरील व विश्वासार्ह मार्गदर्शनासाठीं उपक्रमांचें बीज महाराष्ट्रांत झाल्याविना रहात नाहीं, हें स्पष्ट होतें. "वेस्टर्न इंडियानें एकहि लक्षाधीश निर्माण केला नाहीं" हें तिचें वैशिष्ट्य श्री. चिरमुले ह्यांच्या विशिष्ट ध्येयाचेंच फळ आहे. चिरमुले सत्कार समितीनें प्रकाशित केलेलें हें चरित्र केवळ एका व्यक्तीच्या गुणांचें यथार्थ वर्णन असून तो गेल्या चाळीस वर्षांतील महाराष्ट्राच्या एका व्यावसायिक प्रगतीचा साक्षात् इतिहासहि आहे. श्री. खाडिलकर ह्यांनीं पुस्तकाच्या लेखनाचें कार्य पुस्तकाचे विषय श्री. चिरमुले ह्यांच्या कार्यांत तादात्म्य पावून केलें असल्यामुळें तें उत्कृष्ट वठलें आहे

## हिंदुस्थानांत नैट्रोजन रसायनांचें उत्पादन

### सर पद्मजी जिनवाला ह्यांच्या सूचना

टॅरिफ बोर्डाचे एक माजी अध्यक्ष, सर. पद्मजी जिनवाला, ह्यांनी "नैट्रोजन इंडस्ट्री" या नांवाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. सर जिनवाला हे स्वतः मोठे अनुभविक मांडवलदार व कारखानदार आहेत व वरील पत्रकामांगें विषयाचा सखोल तांत्रिक व आर्थिक अभ्यास आणि राष्ट्रीय वृत्ति दिसून येते. पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत उल्लेखिल्याप्रमाणें नैट्रोजन-रसायनांच्या हिंदी उत्पादनाच्या प्रश्नास त्यांनींच स्वतः टॅरिफ बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें तोंड फोडिलें होतें. ह्या विषयांत लक्ष्य घालण्याचें कारण असें की, हिंदी शेतीस ऊर्जितावस्थेस आणण्यास नैट्रोजन-खतांची मोठी जरूरी आहे. (ता. १६ जुलै, "अर्थ") शिवाय युद्धास लागणाऱ्या सर्व स्फोटक द्रव्यांत मुख्यतः नैट्रोज़नचींच रसायनें असतात.

सर जिनवाला ह्यांच्या पुस्तिकेचा मथितार्थ खालीं देत आहोंत:—

(१) नैट्रोजन रसायनांस आजची व भावी मागणी :—नैट्रोजनचें मुख्य रसायन अमोनिया होय. त्याचा पुढील धंद्यांत उपयोग होतो. (अ) खतें (ब) बर्फाचे कारखाने (क) क्लोरिन् बरोबर पाण्यांत टाकण्यास (ड) पेट्रोलियमच्या धंद्यांत व रेशिम व सूत यांना रंग देतांना (ई) रबर (फ) वेल्डिंग व तदनुषंगिक धंदे. याशिवाय नायट्रिक ॲसिड व त्यापासून अगणित रसायनें, रंग, स्फोटक द्रव्यें, कृत्रिम रेशिम इ. इ.

यांपैकी फक्त खतांचा विचार केल्यास, हिंदुस्थानांत युद्धापूर्वी वर्षास १५,००० टनें नैट्रोजन खपत असे. सर जिनवाला यांच्या म्हणण्याप्रमाणें ही मागणी भावी मागणीच्या १% देखील नाहीं.

दुसऱ्या विभागांत अमोनिया तयार करण्याच्या कृति देण्यांत आल्या असून त्यांत सर्व शक्य कृतींचा ऊहापोह केला आहे. मुख्यतः (अ) हैड्रोइलेक्ट्रिक वीज (ब) कोळशापासून वीज (क) वॉटर गॅस या कृतींचा विचार केला आहे. शिवाय लोखंडाच्या भट्टींतील गॅसचा उपयोग करतां येईल काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. एकंदरींत सर साहेबांचें मत शेवट उल्लेखिलेल्या दोन कृतींकडे झुकतें.

पुस्तिकेच्या तिसऱ्या विभागांत अमोनियापासून होणाऱ्या कांहीं मुख्य रसायनांचा विचार केला आहे.

त्यानंतर सर जिनवाला ह्यांनी निरनिराळ्या कृतींस लागणाऱ्या मांडवलाच्या व विक्रयाच्या किंमतींचे अंदाज दिले आहेत. नंतर ह्या धंद्यांत प्रथमतः किती यंत्रसामुग्री घालणें इष्ट आहे याबद्दल मतें प्रदर्शित केलीं आहेत. शिवाय हिंदुस्थानांत गंधक नसला तरी सल्फ्युरिक ॲसिडची अडचण जिप्समच्या सहाय्यानें कशी दूर होईल हें दर्शविलें आहे. सर साहेबांच्या मतें वर्षास २०,००० टन नैट्रोजनाच्या उत्पादनास लागणारी यंत्रसामुग्री पैदा करावी.

नंतर त्यांनीं कारखाना कोठें उभारावा व मांडवल किती लागेल याचा विचार केला आहे. (अ) हैड्रो-इलेक्ट्रिक रुपये ४,९३,००,००० (ब) कोळशापासून वीज रु. २,४६,००,००० (क) वॉटर गॅस वा कोक ओव्हन गॅस रु. १,९५,००,००० याप्रमाणें खर्च येईल असा त्यांचा अंदाज आहे.

पुस्तिकेच्या पुढील विभागांत नैट्रोजन कारखाना एखाद्या लोखंडाच्या भट्टी शेजारीं काढल्यास कसें होईल याचा विचार केला आहे. सर जिनवाला यांच्या मतें अशा ठिकाणींच कारखाना काढणें फार चांगलें होईल.

बाहेरच्या जगांतील आर्थिक व इतर घडामोडींपासून या धंद्यांचें संरक्षण करणें कसें जरूर आहे व तें कसें करितां येईल याबद्दलचे त्यांचे अनुभवाचे बोल पुस्तिकेच्या शेवटीं दिले आहेत. सर जिनवाला यांच्या मतें साम्राज्य सरकारच्या मनांत हा धंदा इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रिजच्या हातीं द्यावयाचा आहे. या कंपनीनें जगभर केलेल्या कारवाया, कंपनी व ब्रिटिश सरकार यांचे संबंध, कंपनीनें साम्राज्यांतील स्फोटक रसायनांचा धंदा आपल्या हातांत कसा आणला व आतां हिंदुस्थानांतहि कंपनी आपले पाय रोवण्याची कशी तयारी करीत आहे याचें वर्णन फार सूक्ष्म दृष्टीनें केलें आहे. साम्राज्य सरकारचा हा डाव फसवणें हें कसें अगत्याचें आहे हें त्यांनीं दाखविलें आहे. इं. के. इंडस्ट्रीजकडून हिंदुस्थानास शक्य ती मदत मिळावी व दोघांचाहि फायदा व्हावा परंतु हा धंदा त्या कंपनीनें गिळंकृत करूं नये यासाठीं काय करितां येईल याबद्दल त्यांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकार, लष्करी खातें व प्रांतिक सरकारें ह्यांनीं काय केलें पाहिजे हेंही दर्शविलें आहे.

सर जिनवाला ह्यांच्या लिखाणाचा विस्तृत परिचय येथें देणें शक्य नाहीं; तो पुढें देण्यांत येईल.

श्री. चिं. काळे.

---

### शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें एप्रिल ते जून १९४४ ह्या तिमाहींत हुगळी बँक लि., कलकत्ता ही नव्यानें दाखल झाली. शेड्यूल्ड बँकांची संख्या एका वर्षापूर्वी ६७ होती; आतां ती ७९ झाली आहे. एका वर्षाचे मुदतींत शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १६०७ ची २०४१ झाली. इंपीरिअल बँकेनें ६ नवीन शाखा काढल्या, पांच प्रमुख बँकांनीं ८१ शाखा वाढविल्या, एक्सचेंज बँकांच्या पांच कचेऱ्या बंद झाल्या व इतर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३५२ कचेऱ्यांची भर पडली.

### बिगर तिकीट प्रवासास आळा

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवरील विन तिकिटवाल्या प्रवाशांवरील खटले चालविण्यासाठीं सुरत व अहमदाबाद येथें स्टेशनांचे हद्दींतच ऑनररी मॅजिस्ट्रेटांचीं कोर्टें भरविण्यांत येणार आहेत.

# स्फुट विचार

### राकेलचें आर्थिक वैशिष्ट्य

दिव्यांत जाळण्यासाठी राकेल तेल ही वस्तू हिंदुस्थानांत किती महत्त्वाची झाली आहे ह्याची कल्पना त्याचा तुटवडा व वाटणी ह्यांचेविषयीं युद्धकाळांत उपस्थित झालेल्या अडचणींवरून सहज येते. उजेडाशिवाय यंत्रांची प्रेरक शक्ति निर्माण करण्याकडेहि राकेलचा उपयोग होत असल्यानें आधुनिक पद्धतीच्या जीवनांत त्याचेवांचून उत्पादन, वहातूक वगैरे आर्थिक क्रिया समाधानकारक रीतीनें घडणें कठिण झालें आहे. सध्याच्या युद्धांत तर विमानें, रणगाडे, चिलखती गाड्या, जहाजें, पाणबुड्या ह्यांचा संचार व कार्य हीं सर्वस्वीं पेट्रोलवर म्हणजे भूमिगत तेलावर अवलंबून आहेत. युद्धोत्तर काळांत संपत्तीचें उत्पादन, वहातूक व विनिमय ह्यांचेसाठीं ह्या निसर्गदत्त शक्तिसाधनाचा मोठा पुरवठा लागणार आहे. वहातुकीच्या प्रचंड विमानांतून माणसांची व मालाची ने-आण जगभर व्हावयाची आहे आणि तेलाच्या शक्तीनें यंत्रें चालून त्यांचें उत्पादन वाढणार आहे. अलीकडे दगडी कोळशापासून कृत्रिम रीतीनें तेल बनवण्यांत येतें, पण त्यास निसर्गजन्य तेलाची बरोबरी अर्थातच करतां येत नाहीं, आणि शिवाय, कोळसा हा एक निसर्गाचाच ठेवा आहे. ज्याप्रमाणें युद्धांत त्याचप्रमाणें शांततेच्या परिस्थितींत राकेल तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्न आधुनिक मानवी राहाणीच्या दृष्टीनें जिव्हाळ्याचा आहे आणि ह्या जिनसाचा साठा वाटेल तेथें हुकमी रीतीनें सापडत नसल्यानें त्यास अपूर्व स्थान प्राप्त झालें आहे. कित्येक प्रदेशांत पिण्याचें व शेतीच्या उपयोगाचें पाणीहि जमिनींत सापडण्याची मारामार असते, आणि राकेलची वाटणी तर निसर्गानें अत्यंत असमान रीतीनें करून ठेवली आहे. जगांतील विशिष्ट भागांतच जमीनींत तेलाच्या विहिरी खणतां येणें शक्य आहे; इतरत्र त्यांचा पूर्ण अभाव आहे. सध्या हिंदुस्थानांत रॉकेलच्या पुरवठ्याची अडचण भासत आहे, ती ह्या चमत्कारिक नैसर्गिक वाटणीमुळेंच होय. ह्या देशांत कोळसा आहे, पण राकेल नाहीं; तें बाहेरून यावें लागतें. धान्य व कापड ह्यांच्या वाटणीपेक्षा राकेलच्या वाटणीचा प्रश्न असा निराळ्या स्वरूपाचा कां आहे हें यावरून दिसेल. राकेलच्या बाबतींत हिंदुस्थान परावलंबी आहे.

---

### तेलाच्या पुरवठ्याचें जागतिक पुनर्घटनेंत स्थान

युद्धोत्तर काळांत धान्य, यंत्रें, चलन इत्यादि आर्थिक साधनसामुग्रीचा पुरवठा जगामध्यें समाधानकारक रीतीनें व्हावा ह्या विषयीं योजना आखल्या जात असतांना राकेलच्या जागतिक वाटणीचा प्रश्न हातीं घेऊन तो सोडवण्याचा प्रश्न इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं पुढाकार घेऊन सोडवण्याचा उपक्रम करावा हें सहाजिक आहे. राकेल तेलाचा युद्धाशीं व संरक्षणाशीं निकट संबंध येत असल्यानें त्या देशांतील राष्ट्रीय सरकारांनीं त्याच्या पुरवठ्यावर अखेर तें स्वतःचें वर्चस्व स्थापण्याची खबरदारी अगोदरच घेतली आहे. युद्धानंतर जगांतील राष्ट्रांत राकेल अगेल त्याच्या वाटणीच्या संबंधांत स्पर्धा उत्पन्न होईल आणि तीमध्यें राजकीय व आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत होईल. हा घोटाळा वाचवण्याच्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं सौदी अरेबिया, इराक व इराण ह्या देशांत राकेलचे साठे व खाणी आहेत, त्यांच्या उपयोगाची व्यवस्था लावण्याची एक योजना आपापसांत मान्य केली आहे. ह्या क्षेत्रांत ब्रिटिश व अमेरिकन कंपन्यांनीं स्थानिक सरकारांकडून राकेलचा धंदा करण्याचे परवाने मिळवले आहेत. सध्या इराणमधील तेल एका नळांतून भूमध्य समुद्रावर हैफा ह्या बंदरापर्यंत नेलें जातें आणि तेथून त्याची जगांत वाटणी होते. अमेरिकेच्या मालकीच्या असा एक नळ सौदी अरेबियांतून भूमध्य समुद्रापर्यंत टाकण्यांत यावा अशा योजनेची चर्चा आज कित्येक महिने चालली होती. अमेरिका खंडांत वेनिझुएला, कोलंबिया, मेक्सिको वगैरे देशांत राकेल तेलाच्या उत्पादनाचें एक मोठें क्षेत्र आहे आणि मित्रराष्ट्रांस युद्धांत लागणारें बरेंचसें तेल त्यामधून पुरवलें जात आहे. दुसरें मोठें क्षेत्र कॅस्पियनपासून तांबड्या समुद्रापर्यंत पसरलें आहे. त्यांत तेलाचा प्रचंड संचय आहे, पण त्यांतला थोडाच भाग बाहेर आला आहे. ह्या क्षेत्रांत ब्रिटिश कंपन्या व सरकार ह्यांचें प्राबल्य आहे. अमेरिकन कंपन्यांस त्यांत योग्य हिस्सा मिळवण्याची इच्छा होऊन त्यांनीं आपल्या सरकारास सौदी अरेबियांतील तेलाचा नळ भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर नेऊन सोडण्याच्या योजनेंत भाग घेण्यास उद्युक्त केलें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या दरम्यान आतां जो करार होत आहे त्यांत ह्या दोन राष्ट्रांच्या हितसंबंधांच्या रक्षणाची तरतूद आहे आणि त्याचबरोबर इतर देशांस राकेल योग्य भावानें आणि सरळ रीतीनें मिळण्याची व्यवस्था केली जाणार आहे. तेलाच्या पुरवठ्यावरील वर्चस्व हें राजकीय व आर्थिक प्राबल्याचें एक अंग आहे आणि जागतिक पुनर्घटनेंत त्याचें मोठें महत्त्व आहे.

---

### रिझर्व्ह बँकेचा उत्पन्न-खर्च व भागीदारांचें डिव्हिडंड

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १२,००,४२,७९७ रुपये ठोक उत्पन्न झालें. गेल्या वर्षांतील उत्पन्न-खर्चाचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| | ३० जून १९४२ अखेर | ३० जून १९४३ अखेर | ३० जून १९४४ अखेर |
|---|---|---|---|
| ठोक | रु. | रु. | रु. |
| उत्पन्न | ४,५६,४४,५११ | ९,१६,१९,३७५ | १२,००,४२,७९७ |
| खर्च | १,१४,९०,८३० | १,४९,३८,६३५ | १,७३,८४,९८७ |
| नि. नफा | ३,४१,५३,६८१ | ७,६९,८०,७४० | १०,२६,५७,८१० |

बँकेचें उत्पन्न व नफा वाढण्याचें प्रमुख कारण तिचेजवळील व्याज देणाऱ्या कर्जरोख्यांत झालेली वाढ, हें होय. रिझर्व्ह बँकेचा नफा वाढला, तरी भागीदारांच्या वाट्यास त्याचा फारच लहान अंश येतो. १९४१-४२ अखेरपर्यंत भागीदारांस ३½% डिव्हिडंड मिळत आलें आहे व त्यासाठी दरसाल १७½ लक्ष रुपये लागत. चलनविस्तारामुळें बँकेचा नफा कल्पनातीत वाढला, तेव्हां हिंदुस्थान सरकारनें नफावाटणीवर बंधन घालून ४% ची कमाल मर्यादा ठरवून दिली. तिला अनुसरून १९४२-४३ चें ४%, व १९४३-४४ चें ४% डिव्हिडंड भागीदारांस मिळालें आहे. ह्या जादा ½% डिव्हिडंडसाठीं २½ लक्ष रुपये पुरतात. म्हणजे, १९४३-४४ च्या १०½ कोटि रुपयांच्या निव्वळ नफ्यापैकी २० लक्ष रुपये भागीदारांस मिळाले. एकूण नफ्याच्या २% इतकी

रक्कमहि त्यांच्या वाट्यास आली नाही. मध्यवर्ती सरकारास १० कोटि, ९१ लक्ष रुपये मिळाले. त्या पूर्वीच्या वर्षी सरकारास ७ कोटि, ५० लक्ष रुपये मिळाले होते व त्याच्याहि पूर्वीच्या साली सरकारचे वाट्यास ३ कोटि, २४ लक्ष रुपये आले होते.

---

### हिंदी धंद्यांचें भवितव्य

युद्धसामुग्री बाहेरून येणें कठीण झाल्याकारणानें हिंदुस्थानांत शक्य तेवढ्या प्रमाणांत तिचें उत्पादन करणें प्राप्त झालें आणि ह्या योगानें कित्येक जुन्या कारखान्यांचा विस्तार झाला व कांहीं नव्यानेंच अस्तित्वांत आले. ह्या औद्योगिक प्रगतीवरून इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तेथील धंदेवाल्यांनीं असें अनुमान काढलें आहेसें दिसतें कीं युद्धसमाप्तीनंतर मामुली जातींचा परदेशी माल हिंदी बाजारपेठांत खपण्यास वाव रहाणार नाहीं आणि त्यांस नवीन प्रकारांचे जिन्नस बनवावे लागतील व नवीन विक्रीचीं क्षेत्रें शोधणें भाग पडेल. पण ह्या समजुतींत अतिशयोक्तीचा भाग पुष्कळ आहे. स्वदेशी धंद्यांची अशी कांहीं प्रचंड प्रगति ह्या देशांत झालेली नाहीं कीं त्यांच्या स्पर्धेस अमेरिकन व ब्रिटिश धंदेवाल्यांनीं भ्यावें. उलट, हिंदी धंद्यांच्या भवितव्यासंबंधानें येथील कारखानदार साशंक आहेत. ह्या विषयींच्या खऱ्या स्थितीची कल्पना सर होमी मोदी ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतीच करून दिली तिचेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. युद्धपरिस्थितीमुळें विस्तारलेले किंवा उदयास आलेले हिंदी धंदे शांततेच्या काळांत कितपत तग धरतील ह्याची शंका त्यांनीं व्यक्त केली आणि नवीन व मूलग्राही धंद्यांच्या उत्कर्षास लागणारी यंत्रसामुग्री मिळण्याची अडचण पडेल अशी भीति प्रदर्शित केली. कांहीं वर्षांनीं हिंदी धंदे मोठ्या प्रमाणांत विस्तार पावतील आणि मग पाश्चात्य कारखानदारांस नवीं औद्योगिक क्षेत्रें पहावीं लागतील असेंहि ते म्हणाले. ह्याच आशयाचा अभिप्राय सर जॉन मथाय ह्यांनीं व्यक्त केला आहे.

---

### युद्धोत्तर औद्योगिक घटनेच्या योजना

युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानांतल्या जुन्या व नव्या उद्योगधंद्यांस परराष्ट्रीय मालाची स्पर्धा सोसावी लागेल आणि तीमध्यें त्यांचा टिकाव कसा लागेल ह्याची चिंता येथील धंदेवाल्यांस लागणें स्वाभाविक आहे. मध्यवर्ती सरकारचे व्यापार मंत्री, सर अझीझुल हक, ह्यांस कलकत्त्याच्या हिंदी व्यापार मंडळाच्या सभेंत ह्यासंबंधांत प्रश्न विचारला असतां त्यांनीं आश्वासनात्मक उत्तर दिलें. स्वदेशी धंद्यांच्या वाढीचें व स्वास्थ्याचें महत्त्व सरकारास अवगत असून परदेशी मालाच्या आयातीचे परवाने केवळ सहा महिन्यांच्या मुदतीपुरते देण्यांत येतात आणि दर वेळेस आयात व्यापाराचा देशी मालावर होणारा परिणाम लक्षांत घेतला जाऊन त्यांची व्यवस्था होत असते असें त्यांनीं सांगितलें. नेहेमींच्या लोकोपयोगी जिनसांचा देशांतील पुरवठा, त्यास असलेली मागणी, स्वदेशी माल उपलब्ध होण्याची शक्यता, जहाजांच्या वहातुकीची सोय इत्यादि बाबी हिशेबांत घेऊन सरकार बाहेरून जिन्नस आणण्यास परवाने देतें आणि ह्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांची अनास्था होण्याची भीति नाहीं असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. हिंदी कारखानदार आणि धंदेवाले ह्यांच्या युद्धोत्तर गरजांविषयींची माहिती सरकारनें मागितली आहे, पण ती न पुरवण्यांत आल्याची तक्रार सर अझीझुल हक ह्यांनीं केली. सरकारनें एक खास योजना-अधिकारी नेमला असून धंदेवाल्यांकडून माहिती गोळा करण्याचें काम त्याचेकडे सोंपवण्यांत आलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. हिंदी धंदेवाल्यांच्या युद्धोत्तर योजना व गरजा आणि सरकारचे नियोजक अधिकारी व समित्या ह्यांचा मेळ बसणें अगत्याचें आहे. असें न झाल्यास राष्ट्रीय योजनात्मक धोरण निष्फळ ठरेल.

(Consent of Central Government has been obtained to this issue under Defence of India rule 94 A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for financial soundness of any scheme or the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.)

# प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विकीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ४,७८,४०० |
| जमा झालेलें भांडवल | रु. १,६४,४३५ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २०,००,००० वर |

## शेअर-विक्री चालू आहे

★ बँकेनें गतवर्षी कर माफ ४ टक्के डिव्हिडंड वांटलें आहे.

★ प्रत्येक शेअर रु. १०० चा असून त्यांपैकीं बँक तूर्त फक्त रु. ५० च मागविणार आहे व उरलेली रक्कम बँकिंग कंपन्यांच्या सर्वसाधारण शिरस्त्याप्रमाणें 'रिझर्व्ह लायेबिलिटी' म्हणून राखून ठेवणार आहे.

अर्जाबरोबर प्रत्येक शेअरमागें रु. १५ व अर्जमंजुरीनंतर रु. ३५ भरावयाचे आहेत.

शेअर घेऊं इच्छिणारांनीं शेअरअर्जाबरोबर दर शेअरमागें रु. ५० एकदम पाठविणें सोयीचें आहे.

### संचालक-मंडळ

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष
" ग. उ. चितळे
" एल. आर. घडफळे
" डब्ल्यू. पी. वैद्य

श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष
" श्री. म. जोशी
" स. के. भावे
" चिं. त्रिंबक चितळे

" एस. जी. केणी, व्यापारी, मुंबई (खातेदारांतर्फे डायरेक्टर)

## शेअर अर्जाचा नमुना मागवा.

गो. धों. जोगळेकर, बी. कॉम. एलएल. बी., मॅनेजर.

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेची अभिनंदनीय कामगिरी

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेची स्थापना नोव्हेंबर १९३६ साली झाली. बँकेचा हेतु निरनिराळ्या उद्योगधंद्यांना, व्यापारी मंडळींना मदत करण्याचा असून बँकेनें आजवर पुष्कळ संस्था व व्यापारी मंडळी यांना वेळोवेळीं भांडवल देऊन सहाय्य केलें आहे. बँकेची प्रगति थोड्या अवधींत चांगली होत असून बँकेनें १९४१ सालीं स्वतःची इमारत खरेदी करून बँकेला चांगलेंच स्थैर्य प्राप्त करून दिलें आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे बँकेनें कॉमनवेल्थ विमा कंपनीस १९४३ त भक्कम मदत करून ती संस्था महाराष्ट्रीयांच्या ताब्यांत राखण्याचें श्रेय घेतलें. तसेंच कॅनरा पल्प ॲन्ड पेपर मिल्स, पैसाफंड वगैरे पुष्कळ संस्थांना मदत करून हे कारखाने भरभराटीला आणण्याचें श्रेय घेतलें आहे. बँकेच्या चालकांचा वर उल्लेख केल्याप्रमाणें स्तुत्य हेतु व उपक्रम चालू आहे. गेले वर्षी बँकेचें विकलेलें भांडवल ३,०३, ३०० रु. असून जमा भांडवल १,०१, २९५ रु. होतें तें यंदाचे सालीं अनुक्रमें विकलेलें भांडवल ५ ऑगस्ट १९४४ पर्यंत ४,७८,४०० रु. व जमा भांडवल १,६४,४३५ रु. झालेलें आहे. गेले सालीं एकूण खेळतें भांडवल १९,९१,७०० रु. होतें तें आज रु. ३०,००,००० रु. झालेलें आहे. शिवाय बँकेनें गेले सालीं कर माफ डिव्हिडंड शे. ४ टक्के वाटलेलें आहे.' अशा तऱ्हेनें बँकेची उत्तरोत्तर भरभराट होत आहे. नुकतीच एप्रिल १९४४ त बँकेनें इस्माइल बिल्डिंग फोर्ट मुंबई येथें एक शाखा काढली असून तेथील कामहि समाधानकारक आहे. बँकेनें तेथें ॲडव्हायसरी कमिटी नेमली असून

१ श्री. जी. ए. कुलकर्णी, २ श्री. व्ही. जी. गांगल
३ श्री. बी. एच. गुंडेरिया ४ श्री. एम. एम. गद्रे
५ श्री. एल. एम. जोशी आणि

ब्रँच एजंट श्री. जोग गो. ह. अशी मंडळी असून तेथील कारभार त्यांचे सल्ल्यानें चालत आहे. बँकेचे चेअरमन श्री. ग. रा. साठे, प्रोप्रायटर साठे बिस्किटस, हे असून व्हा. चेअरमन श्री. दा. ग. बापट हे आहेत. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चिं. त्रिं. चितळे हे असून हे एक तडफदार, उद्योगधंद्याची आवड असणारे, अत्यंत मनमिळाऊ असे गृहस्थ लाभले आहेत. त्यांनीं बोर्डाचे मदतीनें या बँकेस जी ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली आहे त्यावरून महाराष्ट्रीयांनाही व्यापारांत किती मानाचें स्थान प्राप्त करून घेतां येईल हें सिद्ध झालें आहे.

शिवाय श्री. एस. एम. जोशी, श्री. स. के. भावे, श्री. ग. उ. चितळे, श्री. घडफळे, श्री. व्ही. बी. वैद्य, वगैरे मंडळी असून श्री. एस. जी. केणी मुंबई, हे डिपॉझिटर्सतर्फे डायरेक्टर आहेत. शिवाय रा. जी. डी. जोगळेकर यांची मॅनेजर म्हणून नेमणूक झाली आहे. बँकेला हिंदुस्थान सरकारच्या भांडवल नियंत्रण खात्याकडून रु. १०,००,००० अधिकृत भांडवल विकण्याची परवानगी मिळाली आहे. बँकेच्या शेअर भांडवलांत व खेळत्या भांडवलांत सारखी वाढ होत आहे.

मध्यवर्ती सरकारच्या भांडवल नियंत्रण अधिकाऱ्याकडून भाग विकण्यास अनुज्ञा मिळाल्यानें भागविक्री झपाट्यानें सुरू झाली असून त्याचा सर्वांनीं अवश्य फायदा घ्यावा असें आम्ही सुचवितों.

## टाटा केमिकल्स लि.

### मिठापूरचें रूपांतर

मिठापूर येथील टाटा केमिकल्स लि. ची मूळ योजना टाटांच्या सांगण्यावरून श्री. कपिलराम हरदेवराम वकील ह्यांनीं आखली. मि. जे. ए. रीव्हेल ह्यांच्या अध्यक्षत्वाखालील एका ब्रिटिश तज्ञांच्या मंडळानें ह्या योजनेची तपशीलवार छाननी करून आपला अहवाल १९३७ मध्यें सादर केला व त्यास अनुसरून टाटांनीं रासायनिक धंद्याची ही मुहूर्तमेढ रोवली. कारखान्याच्या स्थापनेस मिठापूर (बडोदें संस्थानांतील ओखामंडळ जिल्ह्यांतील काठेवाडच्या टोकाचें ठिकाण) हें केंद्र मुकर करण्यांत आलें. टाटांनीं ओखा सॉल्ट वर्क्स मिळवून फेब्रुवारी १९३९ मध्यें मेसर्स टाटा केमिकल्स लि. ही कंपनी नोंदविली. जूनमध्यें जर्मनी, फ्रान्स, ग्रेट-ब्रिटन, स्वीडन, स्वित्सरलंड आणि अमेरिका ह्या देशांतून यंत्र-सामुग्री मागविली. परंतु युद्ध उपस्थित झाल्याकारणानें वेळापत्रक चुकलें. श्री. कपिलराम वकील हे विमानमार्गें अमेरिकेस स्वतः गेले. वहातुकीमधील बुडण्याच्या धोक्यामुळें कित्येक माल हिंदुस्थानांत दाखल होण्यापूर्वी दोनदां, तीनदां ऑर्डर करावा लागला. मिठापूरच्या वाळवंटाचें आतां मोठ्या औद्योगिक शहरांत रूपांतर झालें आहे. मूलग्राही रसायनांचें उत्पादन मूळ योजनेप्रमाणें मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यावर कारखान्याची वाढ करण्याची योजना आजच तयार आहे. रंग, खतें, औषधें, कांच, इत्यादींच्या उत्पादनास आवश्यक अशीं रसायनें निर्माण करणारी टाटा केमिकल्स कंपनी आपल्या क्षेत्रांत टाटा आयर्न ॲंड स्टील कंपनीची बरोबरी लवकरच करूं लागेल.

**युद्ध संपलें तरी रेशनिंग तात्काळ संपणार नाहीं.**

युद्धसमाप्तिनंतरहि एक दोन वर्षे रेशनिंग चालू रहाण्याचा संभव आहे, असें मत प्रांतिक रेशनिंग अधिकारी, श्री. समर्थ, ह्यांनीं नुकतेंच व्यक्त केलें.


# पाहिजेत

## अकौन्टन्ट व सुपरवायझर असे दोन इसम नेमणेचे आहेत.

**अकौन्टन्टः**—जी. डी. सी. अगर को-ऑपरेटिव्ह सेक्रेटरीची परीक्षा पास असून सेल परचेस युनियनमध्यें काम करीत असलेला अनुभवी अथवा व्यापारी हिशेबाची पूर्ण माहिती असून इंग्रजी जाणणारा अशांनीं सोसायटीचे पत्त्यावर अर्ज पगाराचे अटीसह ता. ३१।८।४४ चे आंत पाठवावेत.

**सुपरवायझरः**—सोसायटीचीं दुकानें तपासणी करण्यास इंटर-आर्ट्स, को-ऑपरेटिव डिप्लोमा होल्डर अगर सुपरवायझिंग युनियनमध्यें काम करीत असणारा सुपरवायझर किंवा सिनिअर ग्रूप सेक्रेटरी अशांनीं सोसायटीचे पत्त्यावर अर्ज पगाराचे अटीसह ता. ३१।८।४४ चे आंत पाठवावेत.

R. T. ZUNJARRAO,
चेअरमन,
दी मुरबाड तालुका सहकारी खरेदी-विक्री युनियन लि.
मुरबाड, जि. ठाणें.

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री आहे. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.



सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )

## टोमॅटो केचप ( गोड ) व

## टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रूरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.



तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रमावी साधन

## कॅलेंडर्स

( १९४५ )

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—

प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

दि आर्ट कॅलेंडर्स लि.

१५ बुधवार पेठ, पुणें २



पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.



प्रगतिपथावरील नवा

## मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर



JUST PUBLISHED

## INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

( Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay ).

Price Rs. 8

( Postage extra ).

*Sole Selling Agents :—*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE, FORT, BOMBAY.



Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.


हे पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोण्डव वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांबुर्डा, घ. नं. ९२७।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.